वर्ष : ०६ | अंक: ०१ | मुंबई, मंगळवार २६ नोव्हेंबर २०१९ ते सोमवार २ डिसेंबर २०१९ | पृष्ठ: ४

# पोलीस बातमी पत्र

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

मूल्य २/- रुपये

POSTAL REGISTRATION NO. PLG/205/2019-2021

WeWite: www.policebatmipatra.com
www.policebatmipatra.in

संपादक:- दिपक मोरेश्वर नाईक | कार्यकारी संपादक:- गुरुप्रसाद दिपक नाईक | सह संपादक:- सौ अश्विनी नाईक-परब

PG 2 सत्ताखेळामुळे पोलिसांवर ताण; मोठी नाराजी

3 → राज्य संकटात असताना सत्तेसाठीचा खेळ चीड आणणारा

राज्याच्या तिजोरीलाही मंदीची झळ! ← 4

# सत्तासंघर्ष कायम





# सर्वोच्च न्यायालयात आज अंतिम सुनावणी

**नवी दिल्लीः महाराष्ट्रात देवेंद्र फडणवीस यांचंच सरकार येणार की विरोधकांची सरशी होणार याबद्दलचा सस्पेन्स आणखी एक दिवस कायम राहणार आहे. फडणवीस व अजित पवार यांच्या शपथविधीला आव्हान देत शिवसेना, राष्ट्रवादी व काँग्रेसच्या आघाडीनं सर्वोच्च न्यायालयात केलेल्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालय उद्या सकाळी साडेदहा वाजता निर्णय देणार आहे. महाराष्ट्रच नव्हे तर अवघ्या देशाचं लक्ष या निकालाकडं लागलं आहे.**

महाराष्ट्रात शिवसेना, काँग्रेस व राष्ट्रवादीचे सरकार येणार असं वाटत असतानाच भाजपनं रातोरात अजित पवारांना फोडून नव्या सरकारचा शपथविधी घडवून आणला. त्यामुळं राज्याच्या सत्ताकारणाला कलाटणी मिळाली. मात्र, नव्या सरकारचा शपथविधी घडवून आणण्याच्या संपूर्ण प्रक्रियेलाच महाविकास आघाडीनं न्यायालयात आव्हान दिलं होतं. शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली सरकार स्थापन करण्यासाठी तीन पक्षांच्या महाविकास आघाडीला आमंत्रित करण्याचे आदेश राज्यपालांना द्यावे, अशी मागणी याचिकेत करण्यात आली होती. या तातडीच्या याचिकेवर रविवारी न्या. एन. व्ही. रामणा, न्या. अशोक भूषण व न्या. संजीव खन्ना यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. दोन्ही बाजूच्या वकिलांचे युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयानं भाजपला सत्तास्थापनेच्या दाव्याची पत्रं सादर करण्याचे आदेश दिले होते. त्यानंतर आज पुढील सुनावणी झाली.

पहाटे ५.१७ वाजता राष्ट्रपती राजवट उठवण्याची आणि ८ वाजता शपथ घेण्याची इतकी घाई का?, असा सवाल शिवसेनेच्या वतीनं ॲड. कपिल सिब्बल यांनी केला.

उर्वरित पृष्ठ 2 वर






# महाराष्ट्राच्या माथी गाढवाचं मुंडकं आणि रेड्याचं धडः उद्धव

**मुंबईः भाजपच्या धक्कातंत्रामुळं संतापलेले शिवसेनेचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी पक्षाचे मुखपत्र दैनिक 'सामना'च्या अग्रलेखातून भाजपवर जोरदार तोफ डागली आहे. 'मुंडके गाढवाचे आणि धड रेड्याचे असा प्रकार महाराष्ट्राच्या माथी मारून फडणवीस व अजित पवार एकमेकांना लाडू भरवतातहेत. पण हे लाडू त्यांना पचणार नाहीत. त्यांचे बंड फसले आहे,' असा घणाघात उद्धव यांनी केला आहे.**

महाराष्ट्रात शिवसेना, काँग्रेस व राष्ट्रवादीचे सरकार येणार असं वाटत असतानाच भाजपनं अजित पवारांना फोडून नव्या सरकारचा शपथविधी घडवून आणला. त्यामुळं राज्याच्या सत्ताकारणाला कलाटणी मिळाली. मुख्यमंत्रिपदासाठी भाजपपासून दूर झालेल्या शिवसेनेसाठी हा धक्का होता. उद्धव ठाकरे यांनी पहिल्याच दिवशी यावरून भाजपवर निशाणा साधला होता. आज पुन्हा एकदा भाजप, फडणवीस व अजित पवारांना लक्ष्य केलं आहे.








# दिल्लीवरील हल्ल्याचा मोठा कट उधळला

## आसाममधील गोलपोरा येथून तिघे अटकेत

**नवी दिल्ली : दिल्ली पोलिसांनी दहशतवादी हल्ल्याचा मोठा कट उधळून लावला असून आसाममधील गोलपोरा येथून तीन संशयित दहशतवाद्यांना अटक करण्यात आली आहे. प्रथम आसाममध्ये एका जत्रेत चाचणीदाखल स्फोट घडवून आणायचा आणि नंतर दिल्लीत त्याचप्रकारे स्फोट घडवून आणायचा, असा या तिघांचा कट होता, अशी माहिती पोलीस उपायुक्त प्रमोद कुशवाह यांनी दिली. दिल्ली पोलिसांच्या विशेष पथकाने ही कारवाई केली. दरम्यान, या तिन्ही आरोपींचे 'आयसिस' या दहशतवादी संघटनेशी 'कनेक्शन' असण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.**



मुकद्दीर इस्लाम, रंजीत अली आणि जमाल अशी अटक करण्यात आलेल्या तीन आरोपींची नावे आहेत. जमाल हा बारावी उत्तीर्ण झालेला आहे, इस्लाम हा वाहनचालक असून मासे विक्रीचा व्यवसाय करतो तर रंजीत अली हा मासे विक्रेत्याकडे मॅनेजर म्हणून काम करतो, अशी माहिती कुशवाह यांनी दिली. तिघेही २५ ते ३० वर्षे वयाचे आहेत, असेही त्यांनी नमूद केले.

तिघांनाही आसाममधून अटक करण्यात आली असून शस्त्रास्त्र तसेच स्फोटक पावडर त्यांच्याकडून हस्तगत करण्यात आली आहे. आयईडी बनवण्यासाठी वापरण्यात येणारी ही पावडर या तिघांकडून कोणत्या माध्यमातून आली याचा तपास पोलीस करत आहेत. आरोपींचा आयसिस या दहशतवादी संघटनेशी संबध असण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. आरोपींकडून जी स्फोटकं बनवण्यात आली आहेत ती स्फोटकं आयसिसच्या व्हिडिओचा आधार घेऊन बनवण्यात आली आहेत, असे प्रथमदर्शनी दिसत आहे. या तिघांनी मिळूनच हा कट रचला असावा. प्रथम आसाममध्येच चाचणी म्हणून एका जत्रेत स्फोट घडवून आणायचा. त्यानंतर दिल्लीत गर्दीच्या ठिकाणी स्फोट घडवून आणायचा, असा या तिघांचा कट होता, असेही पोलिसांच्या तपासातून उघड झाले.

अटक करण्यात आलेल्या तीन आरोपींचं पाकिस्तानशी काही कनेक्शन आहे का, अशी विचारणा केली असता त्याबाबत तपास सुरू आहे. आताच तसं काही सांगता येणार नाही, असे उपायुक्तांनी नमूद केले.

# एअर इंडिया, बीपीसील मार्चपूर्वीच विकून टाकणार

**नवी दिल्ली- मंदीच्या तडाख्याने भरकटलेल्या अर्थव्यवस्थेची गाडी रुळावर आणण्यासाठी सरकारने एअर इंडिया आणि भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन (बीपीसीएल) या कंपन्या मार्चपूर्वीच विकूण टाकण्याचा निर्धार केला आहे. या व्यवहारातून एक लाख कोटींहून अधिक रुपयांचा निधी उभा करण्याची सरकारची योजना आहे, अशी माहिती केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी एका इंग्रजी वृत्तपत्राला दिलेल्या मुलाखतीत दिली.**

कोट्यवधीच्या कर्जाच्या बोझ्याखाली दबलेली एअर इंडिया ही सरकारी विमान कंपनी विकण्यासाठी मागील वर्षभरापासून प्रयत्न सुरु आहेत, मात्र गुंतवणूकदारांनी निरुत्साह दाखवला. या विक्री प्रक्रियेला वेग देऊन चालू आर्थिक वर्ष संपण्यापूर्वी

उर्वरित पृष्ठ 2 वर

# सत्ताखेळामुळे पोलिसांवर ताण; मोठी नाराजी

**राज्यातील सत्ताखेळाचा मुंबई पोलिसांवर प्रचंड ताण पडत आहे. मुंबई हेच राजकीय घडामोडींचे केंद्र बनले असून, शहराच्या कानाकोपऱ्यातील हालचालींनुसार त्या-त्या ठिकाणी पोलिसांना बंदोबस्त ठेवावा लागत आहे. उद्या, मंगळवारी मुंबई हल्ल्याला ११ वर्षे पूर्ण होत असून, त्यासाठीच्या सतर्कतेची जबाबदारीही पोलिसांवर आहे. त्यापाठोपाठ ६ डिसेंबरला बाबरी मशिद पाडल्याचा दिवस व महापरिनिर्वाण दिनासाठीही पोलिसांना सज्ज राहावे लागणार आहे.**



विधानसभा निवडणूक, निवडणूक निकाल, दिवाळी, सत्ताघोळ आणि आता भाजपच्या सत्तास्थापनेनंतर निर्माण झालेला संघर्ष अशा महिनाभराच्या घटनाक्रमात विशेषत: मुंबई पोलिसांची शारीरिक व मानसिक ओढाताण सुरू आहे. झेड, झेड प्लस सुरक्षा असलेले राज्यातील सर्व व दिल्लीतीलही काही नेते मुंबईत एकवटले आहेत. भल्या पहाटेपासून रात्री उशिरापर्यंत या नेत्यांच्या मुंबईभर भेटीगाठी सुरू आहेत. त्यांच्या मोटारींचा ताफा रस्त्यावर उतरताच पोलिसांनाही नाक्या-नाक्यावर सज्ज राहावे लागत आहे. त्यांच्या भेटींच्या तसेच मुक्कामाच्या ठिकाणी अतिरिक्त कर्मचारी तैनात ठेवावे लागत आहेत. मातोश्री, वर्षा निवासस्थान, सह्याद्री अतिथिगृह, सिल्व्हर ओक, राजभवन, शिवसेना भवन तसेच असंख्य नेत्यांची निवासस्थाने आणि पक्षीय कार्यालये याठिकाणी कार्यकर्ते आणि नेत्यांच्या बैठकांचा रतीब सुरू आहे. तेथेही पोलिसांना दक्ष राहावे लागते. भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी कॉंग्रेस, कॉंग्रेस या सर्वच पक्षांचे आमदार मुंबईत आहेत. त्यांना मुंबईतील वेगवेगळ्या हॉटेलांमध्ये ठेवण्यात आले आहे. तेथेही पोलिसांना तैनात करण्यात आले आहे.

# पवार साहेबांना सोडू नका, उत्तर आम्हाला द्यावं लागतय; कार्यकर्त्याने धनंजय मुंडेंना सुनावले

**मुंबई** - राष्ट्रवादी कॉंग्रेसचे नेते अजित पवार यांनी भाजपसोबत जाण्याचा निणर्य घेत उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. तर अजित पवारांच्या भूमिकेशी असहमत असलेल्या शरद पवार यांनी भाजपसोबत जाण्याचा प्रश्नच येत नसल्याचे सांगितले. त्यामुळे राज्याच्या राजकारणात मोठा पेच निर्माण झाला आहे. या घडामोडीनंतर अजित पवार आणि त्यांच्यासोबत गेलेल्या आमदारांना सर्वसामान्यांमधून मोठा विरोध होत आहे.

अजित पवार यांच्या शपथविधीच्या वेळी ११ आमदार उपस्थित होते. यामध्ये धनंजय मुंडे आघाडीवर होते. परंतु, सोबतचे जवळ-जवळ ९-१० आमदार हे शरद पवार यांच्याकडे परतले आहे. तर धनंजय मुंडे संपूर्ण दिवसभर नॉट रिचेबल होते. त्यामुळे ते अजित पवारांसोबत आहेत अशी चर्चा रंगली होती. मात्र अखेर धनंजय मुंडे राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या बैठकीला उपस्थित झाले होते.

दरम्यान धनंजय मुंडे हे अजित पवारांच्या बंडात सामील असल्याचे वृत्त माध्यमांमध्ये आले होते. त्यानंतर धनंजय मुंडे यांनी आपण राष्ट्रवादी पक्षासोबत आणि शरद




पवार यांच्यासोबतच असून कोणीही संभ्रम निर्माण करू नये, अशी पोस्ट ट्विटरवर शेअर केली होती. त्यावर लगेच प्रतिक्रिया सुरू झाल्या होत्या. एका कार्यकर्त्याने ट्विटरवरच प्रतिक्रिया देताना धनंजय मुंडेंना सुनावले. साहेब मी स्वत: तुम्हाला सात ते आठ कॉल केले. तुमचा फोन नॉट रिचेबल होता. तुम्ही पवार साहेबांची साथ सोडली तर मी आत्महत्या करेल, कारण जनतेला उत्तर तुम्हाला नव्हे तर आम्हाला द्यावे लागतात, असंही कार्यकर्त्याने आपल्या प्रतिक्रियेत म्हटले आहे.

# मुली, महिलांसाठी मुंबई असुरक्षितच!

**मुंबई-** देशातील सर्वाधिक सुरक्षित शहरांपैकी एक अशी ओळख असलेले मुंबई शहर मुली-महिलांसाठी असुरक्षित बनू लागल्याचे धक्कादायक चित्र आहे. मुंबईत २०१८-१९ या वर्षात बलात्काराच्या घटनांमध्ये २२,तर विनयभंगाच्या गुन्ह्यांमध्ये ५१ टक्के वाढ झाली आहे. बलात्काराच्या एकूण घटना पहिल्या,तर अत्याचार झालेल्या ६९ टक्के मुली या अल्पवयीन आहेत. विशेष म्हणजे, महिलांवर अत्याचार करणारे ९० टक्के आरोपी हे ओळखीचेच असल्याची धक्कादायक बाब 'प्रजा फाउंडेशन'या संस्थेच्या अहवालातून समोर आली आहे.

मुंबईतील एप्रिल २०१८ ते मार्च २०१९ या कालावधीमधील गुन्ह्यांची आकडेवारीचा तपशील गुरुवारी 'प्रजा फाउंडेशन'ने जाहीर केला. यामध्ये सोनसाखळी चोरी, घरफोडी यांसारख्या गुन्ह्यांमध्ये घट झाली असतानाच दुसरीकडे महिला अत्याचारांमध्ये वाढ झाल्याचे दिसून येते. विशेष म्हणजे, अल्पवयीन मुले आणि मुली नराधमांचे बळी ठरण्याचे प्रमाण अधिक आहे. गुन्ह्यांची आकडेवारी वाढत असताना दुसरीकडे त्यांची उकल होण्याचे प्रमाणे कमी होत आहे. मुंबई पोलिस दलात सहायक पोलिस निरीक्षक आणि उपनिरीक्षक हे तपास अधिकारी म्हणून काम करीत असतात. मात्र, 'प्रजा'च्या आकडेवारीनुसार सहायक निरीक्षकांची ४१ टक्के तर



उपनिरीक्षकांची २८ टक्के पदे रिक्त आहेत. मुंबईत घडणाऱ्या गुन्ह्यांबाबत विधिमंडळात आवाज उठवण्यात लोकप्रतिनिधी कमी पडत असल्याचेही 'प्रजा फाउंडेशन'च्या अहवालातून स्पष्ट झाले आहे. सन २०१८-१९मध्ये आमदार राम कदम, राज पुरोहित आणि रमेश लटके यांनी गुन्ह्यांबाबत एकही प्रश्न सभागृहात उपस्थित केला नाही. सन २०१४ ते २०१९ या पाच वर्षांच्या कालावधीत रमेश लटके यांनी केवळ पाच तर राम कदम यांनी अवघा एक प्रश्न उपस्थित केला आहे.

# सावधान मुंबईकर: थंडी आणि प्रदुषणामुळे बळावतोय श्वसनरोग



**मुंबई-** शहरात थंडी सुरू झाल्यावर प्रदूषणात मोठी वाढ होऊ लागली आहे. परिणामी श्वसनविकाराच्या रुग्णांची संख्या वाढत आहे. वांद्रे-कुर्ला संकुलात हवा अत्यंत धोकादायक श्रेणीत होती, तर कुलाब्यातील हवा प्रदूषित श्रेणीत आली आहे. मुंबईत चार-पाच दिवसांपासून थंडीची चाहूल लागली आहे. तापमानात घट होत असताना हवेचा वेग कमी झाल्याने प्रदूषण वाहून जाण्यावर मर्यादा येत आहेत. त्यामुळे प्रदूषणाच्या पातळीत वाढ होत आहे. वांद्रे-कुर्ला संकुल या प्रमुख वाहतूक जंक्शनवरील हवा सलग तिसऱ्या दिवशी अतिप्रदूषित होती. त्या खालोखाल कुलाबा परिसरातील हवा धोकादायक श्रेणीत आली आहे. सायंकाळी कुलाबा येथील प्रदूषणाच्या पातळीत घट झाली. नवी मुंबईतील हवा १० ते १५ दिवसांपासून धोकादायक श्रेणीत आहे.

प्रदूषणामुळे होणाऱ्या आजारांच्या रुग्णांची संख्या ३० टक्क्यांनी वाढली असल्याचे डॉक्टरांकडून सांगण्यात येत आहे. खराब हवेमुळे श्वसनाचे रुग्ण वाढत असल्याचे वांद्रे येथील एका डॉक्टरने सांगितले. घसा खवखवणे, खोकला असे आजार प्रामुख्याने दिसत आहेत. पूर्वीपासून श्वसनाचे आजार असलेले रुग्ण, ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांना याचा अधिक धोका असल्याचेही डॉक्टरांकडून सांगण्यात आले.

सर्दी-खोकला, अस्थमा, सीओपीडी अशा आजारांच्या रुग्णांची संख्या ३० टक्क्यांनी वाढली आहे. हवेतील बदलांमुळे पूर्वीपासून गंभीर आजार असलेल्या रुग्णांनी मास्क वापरण्यास हरकत नाही.

# राज्यात अमली पदार्थांची राजरोस विक्री

## झोपडपट्टी, पान टपऱ्यांवर सहज उपलब्ध; महाविद्यालयीन विद्यार्थी बळी

**पालघर-** पालघर तालुक्यातील झोपडपट्टी व गजबजलेल्या वसाहतींमध्ये अमली पदार्थांची राजरोस विक्री होत असून त्यावर नियंत्रण ठेवण्यास पोलीस यंत्रणा कुचकामी ठरली आहे. या अमली पदार्थांच्या आहारी महाविद्यालयीन आणि अभियांत्रिकी विद्यार्थी जात आहेत. त्याशिवाय शहरातील पानटपऱ्या आणि तंबाखूजन्य पदार्थ विक्री करणाऱ्या दुकानांमध्ये 'मँगो गोळी' आणि 'मँगो चूर्ण' नावाचा अमली पदार्थ उपलब्ध होत असून याकडेही पोलिसांचे दुर्लक्ष झालेले आहे.

उत्तरेकडील राज्यांतून अमली पदार्थ रेल्वेतून आणले जातात. गाडीतील शौचालयात किंवा शौचालयाच्या टाकीच्या भागात असे साठे पद्धतशीरपणे लपवले जात असल्याची माहिती पुढे आली आहे. हे पदार्थ पालघर, बोईसर येथील काही ठिकाणी गोदामांमध्ये उतरून नंतर त्यांचे वितरण केले जाते. गांजा, अफू आणि इतर अमली पदार्थांची विक्री कागदाच्या



पुड्यांमध्ये २० रुपये ते २५० रुपये दराने पालघर पूर्वेकडील गांधीनगरमधील दुकानांमध्ये राजरोसपणे केली जात आहे. बोईसर येथील काही कामगार वसाहतींमध्येही हे अमली पदार्थ सहजगत्या उपलब्ध होत असल्याची माहिती पुढे आली आहे. इतकेच नाही तर पालघर रेल्वे स्थानक आवारातील पडीक इमारतींमध्ये अमली पदार्थांचे सेवन करणाऱ्या काही जणांना पोलिसांनी नुकतेच ताब्यात घेतले होते. पोलीस अनेक ठिकाणी छापे टाकत असले तरी अमली पदार्थांच्या विक्रीवर परिणाम झाला नसल्याचे दिसून आले आहे.

मँगो गोळी आणि मँगो चूर्ण नावाचे अमली पदार्थ पालघरमध्ये सहज उपलब्ध होत असल्याचे दिसून आले आहे. या पदार्थांचे वितरण लहान मुलांमार्फत केले जाते, अशी माहिती पुढे आली आहे. हे पदार्थ शहरातील अनेक पानटपऱ्या आणि तंबाखूजन्य पदार्थांच्या विक्रेत्यांकडे उपलब्ध होत असून याविरोधात अन्न आणि औषध विभागाने कारवाई करावी, अशी स्थानिक पोलिसांची भूमिका आहे. या दुकानदारांकडून पोलसांची मर्जी राखली जात असल्याचे आरोप होत आहेत.

# ई-चालान दंड बुडवणाऱ्यांवर एक डिसेंबरपासून कारवाई

**मुंबई-** ई-चालाननुसार दंड न भरणाऱ्यांवर वाहतूक पोलिस १ डिसेंबरपासून कायदेशीर कारवाई करणार आहेत. वाहतूक पोलिस ट्विटर हँडल व समाज माध्यमांवरून आलेल्या वाहतुकीचे नियम मोडणाऱ्या वाहनाच्या छायाचित्राचीही दखल घेत आहेत. या वाहनचालकांना दंडाचे ई-चालान पाठवले जात आहे. थकित दंडाची रक्कम तब्बल ८० कोटींवर गेल्यामुळे कायदेशीर कारवाई करण्याचा निर्णय वाहतूक पोलिसांनी घेतला आहे.

मुंबईतील वाहनांची संख्या वाढून ३३ लाखांवर गेली आहे. त्यामुळे पार्किंगची समस्या बिकट होत चालली आहे. मुंबईत दोन वर्षात 'नो पार्किंग'चे उल्लंघन केल्याच्या प्रकरणांत १६ कोटी ४४ लाखांचा दंड करण्यात आला आहे. त्यापाठोपाठ विनाहेल्मेट दुचाकीस्वारांना ११ कोटी चार




लाखांच्या; तर विनापरवाना वाहनचालकांना चार कोटी रुपये दंडाची ई-चालान जारी करण्यात आली आहेत. बिल्ला नसलेल्या ६९ हजार ७०१ वाहनचालकांना तीन कोटी ४८ लाखांच्या दंडाची ई-चालान पाठवण्यात आली आहेत. काळ्या काचा लावलेल्या कारच्या ११ हजार २०३ चालकांना २२ लाख ४० हजार रुपये, ट्रिपल सीट दुचाकीस्वारांना ४४ लाख ९९ हजारांचा दंड करण्यात आला आहे. ई-चालान प्रणाली २०१७ मध्ये कार्यान्वित झाल्यापासून दंडाची ५९ टक्के रक्कम म्हणजे ६२ कोटी २९ लाख रुपये भरण्यात आलेली नाही. माहिती अधिकार अर्जाच्या उत्तरात शकील शेख यांना मिळालेल्या उत्तरातून हा तपशील समोर आला आहे. वाहतूक पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार २०१७ पासून ३४ लाख ५५ हजार वाहनचालकांना ई-चालानद्वारे १०६ कोटी रुपयांचा दंड करण्यात आला.

# 'गुगल'वरून पर्यटनस्थळांचा शोध महागात

**मुंबई-** गुगल या अग्रगण्य सर्च इंजिनचा दुरुपयोग करून गंडा घालणाऱ्या ऑनलाइन भामट्यांनी आणखी एक पाऊल पुढे टाकले आहे. मुंबई, महाराष्ट्रासह देशातील प्रसिद्ध पर्यटनस्थळांची माहिती 'गुगल'द्वारे जाणून घेणाऱ्या पर्यटकांनाच लक्ष्य करण्यास सुरुवात केली आहे. अशा फसवणुकीबाबत सायबर महाराष्ट्रसह अन्य तपास यंत्रणांनी केलेल्या सूचनांना 'गुगल'ने केराची टोपली दाखवल्याने भामट्यांचा आत्मविश्वास आणखी वाढल्याचे वरिष्ठ अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे.

नागरिकांचा पर्यटनाकडे वाढलेला कल, बसल्याजागी पर्यटनस्थळांची संकेतस्थळावर माहिती मिळवण्याची, ऑनलाइन



शुल्क भरून आरक्षण करण्याची सुविधा लक्षात घेऊन चोरांनी लक्ष पर्यटकांकडे वळविले आहे. जास्तीतजास्त पर्यटक गळाला लागावेत यासाठी भामट्यांनी दिवाळीची सुटी सुरू होण्याआधीच गुगलचा दुरुपयोग करून जाळे विणले आहे. कस्तुरबा मार्ग पोलीस ठाण्यात दाखल झालेल्या गुन्ह्यातून ही बाब स्पष्ट झाली आहे.

गुगल सर्च इंजिनचा वापर करून संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाची माहिती मिळवणाऱ्या पर्यटकांना ऑनलाइन गंडा घालण्याचा प्रयत्न झाला आहे. परिमंडळ वन अधिकारी मनोज पाटील यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, दिवाळीच्या सुटीत (२१ ऑक्टोबर) दमणहून मुंबईत पर्यटनासाठी येऊ पाहणाऱ्या शैलेंद्र मिश्रा यांनी गुगल सर्च इंजिनचा वापर करून राष्ट्रीय उद्यानाची माहिती घेतली. तेव्हा अधिकृत संकेतस्थळासोबत संपर्कासाठी एक भ्रमणध्वनी क्रमांक मिश्रा यांना आढळला. त्यावर संपर्क केला असता समोरून बोलणाऱ्या व्यक्तीने १० रुपये प्रवेश शुल्क ऑनलाइन भरण्यास सांगितले. या व्यवहारासाठी मिश्रा यांचे कार्ड तपशील घेण्यात आले आणि त्यांच्या बँक खात्यातून परस्पर १६ हजार रुपये काढण्यात आले. त्यांच्यासारखाच अनुभव मुंबईबाहेरील जडेजा कुटुंबाला आला. अन्य कुणाची फसवणूक होऊ नये म्हणून या दोघांनी उद्यानाला हा प्रसंग कळवला.

त्यानंतर उद्यानाच्या परिमंडळ वन अधिकाऱ्याने गुगलवर पाहणी केली असता उद्यानाच्या नावासोबत अनोळखी भ्रमणध्वनी क्रमांक आढळला. त्यावरून मिश्रा, जाडेजा कुटुंबाने दिलेल्या माहितीची खातरजमा झाली. वन अधिकाऱ्यांनी गुगलशी पत्रव्यवहार करून संबंधित क्रमांक भामट्यांचा असून त्याद्वारे फसवणूक सुरू असल्याची कल्पना दिली. तसेच हा क्रमांक काढून टाकण्याची विनंती केली.

# मुंबई पोलीस आयुक्तांना पुन्हा मुदतवाढ?

मुंबई पोलिस आयुक्त संजय बर्वे यांचा कार्यकाळ ३० नोव्हेंबर रोजी संपत असल्याने त्यांना पुन्हा मुदतवाढ देण्याच्या हालचाली सुरु झाल्या आहेत. राज्यात राष्ट्रपती राजवट लागू असल्याने मुदतवाढ देण्यात येणार असून राज्यपालांकडून केंद्र सरकारला प्रस्ताव पाठविण्याच्या हालचाली सुरु असल्याचे उच्चपदस्थ अधिकाऱ्यांनी सांगितले.

संजय बर्वे यांची मुंबईच्या पोलिस आयुक्तपदी २८ फेब्रुवारी रोजी नियुक्ती झाली होती. ते ३१ ऑगस्ट रोजी सेवानिवृत्त होणार होते. पण त्यांना विधानसभा निवडणुका व अन्य कारणास्तव तीन महिन्यांची मुदतवाढ देण्याचा प्रस्ताव राज्य सरकारने केंद्राला पाठविला व त्यास मान्यता देण्यात आली होती. ही मुदतवाढ आता ३० नोव्हेंबरला संपुष्टात येत आहे. राज्यात सध्या राष्ट्रपती राजवट लागू आहे. मुंबई पोलिस आयुक्तांसारख्या महत्वाच्या पदावर सेवाज्येष्ठता आणि अन्य निकषांनुसार नियुक्ती करण्याचा निर्णय मुख्यमंत्री घेतात. सर्वोच्च व उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार सेवाज्येष्ठतेनुसार तीन ते पाच अतिवरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांच्या नावाची शिफारस गृहखात्याकडून केली जाते व एकाची निवड मुख्यमंत्र्यांकडून केली जाते. राष्ट्रपती राजवटीत ही प्रक्रिया करुन राज्यपालांना नवीन अधिकाऱ्याची निवड करावी लागणार आहे.

# मेट्रो स्थानक परिसरात होणार गर्दीचे नियोजन

**मुंबई-** शहर आणि उपनगरात मेट्रो जाळे निर्माण झाल्यानंतर प्रवाशांना इच्छितस्थळी जाणे सुकर व्हावे, यासाठी एमएमआरडीएने तयारी सुरू केली आहे. त्याचाच एक भाग म्हणून मेट्रो रेल्वेस्थानक परिसरातील गर्दीचे नियोजन कसे असावे, यासाठी प्रायोगिक तत्वावर प्रकल्प राबवण्यासाठी तीन कंपन्यांची निवड करण्यात आली आहे. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एमएमआरडीए) आणि वर्ल्ड रिसोर्स इन्स्टिट्यूट (डब्लूआरआय) इंडिया रॉस सेंटर यांनी स्टेशन एक्सेस अँड मोबोलिटी प्रोग्रॅम (स्टॅम्प) हा उपक्रम हाती घेतला असून तो राबविण्यासाठी एकूण ८० कंपन्यांचे अर्ज आले होते. यापैकी २८ कंपन्यांना परीक्षकांसमोर सादरीकरण करण्याची संधी देण्यात आली. त्यामधून १४ जणांची निवड झाली होती.

यापैकी तीन कंपन्यांची अंतिम निवड एमएमआरडीए आयुक्त आर. ए. राजीव यांनी केली. या निवड झालेल्या कंपन्यांना मुंबई मेट्रो स्थानक, परिसरात गर्दीचे नियोजन करण्याच्या कामासाठी पथदर्शी प्रकल्प राबवता येणार आहे.

# नोकरीसाठी आता रोबोट करणार तुमची निवड, जाणून घ्या काय असेल मुलाखतीचं स्वरूप

**मुंबई –** नोकरीसाठी मुलाखत घेणयासाठी कंपनीतील 'ं किंवा बॉस असतो मात्र आता हे चित्र बदलताना पाहायला मिळणार आहे. तुमची मुलाखत आता एक रोबोट घेणार आहे. हा प्रयोग पहिल्यांदा फेडरल बँकेनं केला. प्रायोगिक तत्वावर रोबोट फेडरल बँकेत होणाऱ्या मुलाखती घेणार आहे. आर्टिफिशियल इंटेलिजेंसच्या मदतीनं एक टूल तयार करण्यात आलं आहे. FedRecruit या टूलद्वारे ही मुलाखत घेतली जाणार आहे. भरतात पहिल्यांदाच HR ऐवजी रोबोट मुलाखत घेणार आहे. जेव्हा तुमची नियुक्ती होईल तेव्हा तुम्ही शेवटच्या राऊंडला HRuee भेटू शकणार आहेत. मात्र बाकी मुलाखतीचे टप्पे हा रोबोटच घेणार आहे.

FedRecruit वेगवेगळ्या आधारांवर मुलाखतीला येणाऱ्या तरुणांची पारख करु शकणार आहे, कॅन्डिडेटची आकालन क्षमता, बुद्धीमत्ता, चिकाटी, निरीक्षण क्षमता हजरजबाबीपणा या सगळ्या गोष्टी एकाचवेळी रोबोट यशस्वीरित्या तपासू शकणार आहे. मुलाखतीला येणाऱ्या उमेदवाराला अंक दिले जातील. या अंकांच्या आधारावर



रोबोटिक इंटरव्यू, साइकोमेट्रिक आणि खेळ आधारीत असतील. अंकांच्या आधारावर रोबोट तुमचं परीक्षण करणार आहे.

फेडरल बँकेच्या HR chifves इकोनॉमिक टाइम्सला दिलेल्या माहितीनुसार रोबोटिक इंटरव्यूमुळे उमेदवाराचे व्यक्तिमत्व जाणून घेणं अधिक सोप होईल. वर्च्युअल फेस टू फेस इंटरव्यूसाठी व्हिडिओचा वापर केला जाणार आहे.

निवडलेल्या उमेदवाराला एएए केला जाणार आहे. उमेदवाराला ऑफ-लेटर पाठवण्याचं कामही चॅटबॉक्स करणार आहे. ऑक्टोबर २०१९ रोजी बँकेनं परीक्षेद्वारे ३५० उमेदवारांची नियुक्ती करण्यात आली होती. एकूण निवड करण्याचं टारगेट ७०० लोकांचं आहे. त्यापैकी प्रायोगिक तत्वावर ३५० लोकांपैकी १५० लोकांची निवड या रोबोटने केली आहे. हा प्रकल्प प्रायोगिक तत्वावर सध्या राबवला जात आहे. मात्र भविष्यात HR किंवा बॉस ऐवजी अशा प्रकारे जर रोबोट इंटरव्यू घेण्यासाठी आला तर आश्चर्य वाटायला नको.

(पृष्ठ १ वरुन)

# सत्तासंघर्ष कायम

सभागृहातील सर्वात ज्येष्ठ आमदारांना हंगामी अध्यक्ष बनवून तातडीने बहुमत चाचणी घ्या, अशी मागणी राष्ट्रवादी कॉंग्रेसचे वकील अभिषेक मनु सिंघवी यांनी केली. त्यास भाजपचे वकील मुकुल रोहोतगी यांनी आक्षेप घेतला. याचिकेत राष्ट्रपती राजवट हटविण्याच्या निर्णयाला आव्हानच देण्यात आलेलं नाही, याकडं रोहोतगी यांनी लक्ष वेधलं. तसंच, न्यायालयानं या प्रकरणी कोणताही अंतिम आदेश देऊ नये, अशी विनंती केली. सुनावणीअंती न्यायालयानं विश्वासदर्शक ठरावाबाबत उद्या निर्णय दिला जाईल, असं स्पष्ट केलं.

# एअर इंडिया, बीपीसील मार्चपूर्वीच विकून टाकणार

म्हणजे मार्चपूर्वीच एअर इंडियाच्या विक्रीचा सोक्षमोक्ष लावण्याचा निर्णय सरकारने केला आहे. एअर इंडियाला गेल्या आर्थिक वर्षात जवळपास ४६०० कोटींच्या तोट्याची झळ बसली. तेलाच्या किमतीत झालेली वाढ आणि विदेशी चलनाचे नुकसान यामुळे एअर इंडियाचे चाक तोट्याच्या खड्ड्यात आणखी रुतले गेले. बीपसीएलचीही हीच गत असल्यामुळे दोन्ही सरकारी कंपन्या चालू आर्थिक वर्ष संपण्यापूर्वीच विकून टाकण्याचे सरकारने ठरवले आहे, असे अर्थमंत्री सीतारामन यांनी मुलाखतीत स्पष्ट केले.

# सिंचन घोटाळ्याच्या ९ फाइल बंद; अजित पवारांना दिलासा नाही

**मुंबई:** राष्ट्रवादी कॉंग्रेसचे बंडखोर नेते अजित पवार यांनी भाजपशी हातमिळवणी केली असतानाच, देशभरात गाजलेल्या ७२ हजार कोटी रुपयांच्या सिंचन घोटाळ्याप्रकरणी नऊ प्रकरणांच्या चौकशीची फाईल बंद करण्यात आल्याचं समोर आलं आहे. विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळांतर्गत सिंचन प्रकल्पांची उघड चौकशीची फाईल बंद करण्यात आली होती.

## संपादकीय...

# राज्य संकटात असताना सत्तेसाठीचा खेळ चीड आणणारा

सत्तासुंदरीचा मोह कुणालाही सुटलेला नाही. ती प्राप्त करण्यासाठी वाटेल त्या थराला जाणे, हे राजकारणात नवे नाही. महाराष्ट्रापुरते बोलायचे झाले तर त्यातही एक नैतिकता होती. मात्र, रात्रभर ज्या पद्धतीने खेळ केला गेला आणि सकाळी देवेंद्र फडणवीस यांना मुख्यमंत्रिपदाची, तर अजित पवार यांना उपमुख्यमंत्रिपदाची शपथ दिली गेली आणि अजित पवार यांनी ज्या पद्धतीने रात्रीत राष्ट्र वादी काँग्रेस पक्षालाच भाजपच्या दावणीला बांधण्याचा प्रयत्न केला; तो राज्याची वैचारिक



नीतिमत्ता, राजकीय परंपरा धुळीला मिळविणारा आहे. राज्यात सत्तेसाठी गेला महिनाभर जो काही खेळखंडोबा चालला आहे, तो पाहून तमाम महाराष्ट्रातील जनतेवर 'याचसाठी केला होता का मतदानाचा अट्टाहास' असे म्हणत डोक्यावर हात मारून घेण्याची वेळ आली आहे. राज्यातील जनतेने शिवसेना-भाजप महायुतीला स्पष्ट बहुमत देऊन पुन्हा एकदा सत्ता स्थापनेसाठी कौल दिला; परंतु या दोन्ही पक्षांच्या जागा घटल्या. त्यातूनच शिवसेनेच्या महत्त्वाकांक्षेला उभारी आली. मुख्यमंत्रिपदासह 'फिफ्टी-फिफ्टी'चा आग्रह तिने धरला. अमित शहांच्या उपस्थितीत सत्तावाटपाचे हे सूत्र ठरल्याचा शिवसेनेचा हा दावा भाजपने फेटाळून लावला आणि इथेच त्यांच्या तीस वर्षांच्या संसाराच्या काडीमोडाची बीजे रोवली गेली. अडीच वर्षांचे मुख्यमंत्रिपद देत नसाल तर सर्व पर्याय खुले आहेत, असे सांगत शिवसेनेने राष्ट्रवादी आणि काँग्रेसशी संधान साधले.

आम्हाला विरोधात बसण्याचा कौल मतदारांनी दिला आहे. आम्ही विरोधातच बसू, असे सांगणारे या दोन्ही पक्षांचे नेते शिवसेनेबरोबर सत्तास्थापनेला तयार झाले. त्यासाठी त्यांनी शिवसेनेला तिची विचारधारा गुंडाळून ठेवायला लावली. मात्र, मुख्यमंत्रिपदासह राज्याची सत्ता दृष्टिपथात आली असतानाच अजित पवार रात्रीत भाजपच्या गोटात जाऊन बसले. सोबत त्यांनी दहा आमदारांनाही नेले. यामुळे महाराष्ट्र हादरला. अशी अनेक वादळे लीलया पेलणारे शरद पवार यांनीही पुतण्याच्या या बंडानंतर परिस्थिती ज्या पद्धतीने हाताळली ती पाहता राजकारणात अजित पवार एकाकी पडल्याचे चित्र सध्या दिसते आहे. शिवसेनेला



संपादक:-
दिपक मोरेश्वर नाईक

पाठिंब्याची पत्रे द्यायला मुदतवाढ नाकारणा-या, राष्ट्रवादीलाही अधिक वेळ देण्यास संधी न देणा-या राजभवनाने ज्या गतीने भाजपच्या सत्तेसाठी रात्रीत हालचाली केल्या आणि नव्या सरकारचा शपथविधी उरकून घेतला, हा सारा प्रकारच महाराष्ट्राला नवा आहे. त्यांच्या या कृतीला आक्षेप घेत सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले गेले. त्यावर रविवारी सुनावणीही झाली. राज्यपालांचे आदेश सादर करा, असा आदेश देत न्यायालयाने सुनावणी सोमवारपर्यंत तहकूब केली आहे. राज्यपालांनी ३० नोव्हेंबरपर्यंत बहुमत सिद्ध करण्यास देवेंद्र फडणवीस यांना सांगितले आहे. मात्र, इतका वेळ न देता ते कर्नाटकप्रमाणे तातडीने करायला लावावे, अशी विनंती या याचिकेत करण्यात आली आहे. त्यावर सर्वोच्च न्यायालय काय निणर्य देते याकडे सर्वांचेच लक्ष आहे.

जादा वेळ दिल्यास भाजपला घोडेबाजार करायला वाव मिळेल, असे सांगितले जात असले तरी आपले आमदार फुटू नयेत यासाठी सर्वच पक्षांनी दक्षता घेतली आहे. काय होणार ते विधानसभेत विश्वासदर्शक ठरावाच्या वेळी कळेलच; मात्र १९७८ मध्ये वसंतदादांच्या विरोधात बंड करून 'पुलोद'चे सरकार स्थापन करणाऱ्या शरद पवारांपुढे त्यांच्या पुतण्यानेच बंड करून आव्हान दिले आहे. यात भाजप जिंकला काय किंवा शिवसेना जिंकली काय, विश्वासार्हता पवारांचीच पणाला लागली आहे. ती टिकविण्यात काका यशस्वी होणार की पुतण्या, हे त्याचवेळी कळेल. मात्र फोडाफोडी करणार नाही, असे सांगत काँग्रेसच्या नावाने सतत खडे फोडणा-या आणि आपले राजकारण शुचिर्भूत असल्याचा दावा करणा-या भाजपचे हे कसले राजकारण म्हणायचे? अवघा महाराष्ट्र अस्मानी आणि सुलतानी संकटात असताना सत्तेसाठी जो खेळ राजकीय पक्ष आणि नेत्यांनी मांडला आहे, तो चीड आणणारा आहे.

# सत्तेपेक्षा पाण्यासाठी एकजूट दाखवावी!

**या आठवड्याचा माझा हा स्तंभ संपूर्ण देशाचे लक्ष लागून राहिलेल्या महाराष्ट्रातील राजकीय घडामोडींवर असेल, असे तुम्हाला वाटले असेल. राज्यातील या सत्तासंघर्षात जबाबदार राजकीय पक्षांत ज्या प्रकारे एकमेकांना पाणी पाजण्याची स्पर्धा लागली आहे त्याचा विचार करून व या पक्षांच्या वर्तनाने मी खूपच व्यथित झालो आहे. अखेर हे पक्ष परस्परांना पाणी पाजणे कुठवर सुरू ठेवणार? निवडणुकीत जनतेने आपले कर्तव्य बजावले व सरकार स्थापन होईल, अशी अपेक्षा ठेवली. परंतु सत्तेच्या स्वार्थापुढे जनतेची सर्व गणिते फोल ठरली. राजकीय पक्षांचे एकमेकांना पाणी पाजणे सुरूच आहे.**



मग मी विचार केला की, पिण्याच्या पाण्याहून अधिक गंभीर समस्या कोणती असू शकते? त्यामुळे याच समस्येवर लिहावे, झोपी गेलेल्या शासनव्यवस्थेस जागे करावे. आपल्याकडे पाण्याला अमृत मानले जाते. पाणी अंतिम क्षणापर्यंतचा साथी असते. पाणी हा जीवनाचा आधार आहे. पाण्याविना सर्व व्यर्थ, असेही म्हटले जाते. असे असूनही या पाण्याची एवढी दुर्दशा का? आपले नदी, नाले व तलाव एवढे घाणेरडे का? जगातील अनेक देशांमध्ये तुम्ही नळाचे पाणी थेट पिऊ शकता. कारण तेथे सार्वजनिक नळाला येणारे पाणी स्वच्छ व शुद्ध असते। आपल्याकडे नळाला येणारे पाणीही अशुद्ध असते. पैसे भरून लोक असे पाणी पितात व नानाविध आजारांनी आजारी पडतात. मग औषधोपचारांवरील खर्च वेगळाच. बहुतांश आजार दूषित पाण्याने होतात, हे सर्वज्ञात आहे. दूषित पाण्यामुळे देशात दरवर्षी सरासरी दोन लाख लोक प्राण गमावतात, हे जाणून तुम्ही नक्कीच दु:खी व्हाल. मृतांचा आकडा दोन लाख असेल तर आजारी पडणाऱ्यांची संख्या याहून किती जास्त असेल, याची तुम्ही कल्पना करू शकता. समस्या एवढी गंभीर असूनही सरकार त्याविषयी किती गंभीर आहे, असा प्रश्नही तुम्ही विचारू शकता.

देशातील महानगरे व १७ राज्यांच्या राजधान्यांमध्ये नळाने पुरविल्या जाणाऱ्या पाण्याची तपासणी करून केंद्र सरकारने काही दिवसांपूर्वी जो अहवाल प्रसिद्ध केला त्यातून समोर आलेली परिस्थिती भयावह आहे. ज्या २१ शहरांमधील पाण्याची चाचणी झाली त्यात फक्त मुंबईचे पाणी 'भारतीय स्टँडर्ड ब्युरो'च्या कसोटीवर उतरणारे होते. शुद्धतेचे आंतरराष्ट्रीय निकष लावले तर मुंबईचे पाणीही त्या परीक्षेत अनुत्तीर्ण होईल. भारतीय स्टँडर्ड ब्युरोने पिण्याच्या पाण्यासाठी जे ११ निकष ठरविले आहेत त्यापैकी १० निकषांत १७ राज्यांच्या राजधान्यांमधील पाणी नापास झाले! दिल्लीचे पाणी तर सर्वात जास्त दूषित असल्याचे दिसून आले. इतर शहरांचे पाणी त्या तुलनेत जरा कमी दूषित एवढाच काय तो फरक. पाण्यासाठी ठरविलेल्या या निकषांचे पालन करणे बंधनकारक नसल्याने



नळाद्वारे दूषित पाणी पुरविले जात असूनही त्याविरुद्ध कोणतीही कठोर कारवाई होताना दिसत नाही. अहवाल प्रसिद्ध करताना केंद्रीय मंत्री रामविलास पासवान यांनीच ही गोष्ट सांगितली आहे. प्रश्न एवढा गंभीर असूनही त्याकडे कोणी लक्ष का देत नाही? पाणीपट्टी आकारून सरकारी संस्थाच दूषित पाणी पुरवीत असतील तर त्यांच्यावर कारवाई व्हायला हवी. पण तसा कायदाच नसेल तर शिक्षा तरी कशी होणार? शासन व्यवस्थेच्या बेपर्वाईचे हे उत्तम उदाहरण आहे. भारतात फक्त ३० टक्के लोकांना शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध होते, असे आकडेवारी सांगते.

वास्तविक लोक नाइलाज म्हणून दूषित पाणी पितात. आंतरराष्ट्रीय मापदंड तर दूरच राहोत, पण भारतीय मापदंड लावले तरी ग्रामीण भागात दररोज दरडोई किमान ४० लीटर व शहरी भागांत किमान ६० लीटर पाणी उपलब्ध व्हायला हवे. एवढे पाणी पालिकांकडून पुरविले जात नाही. त्यामुळे जेथे कुठे मिळेल ते पाणी लोक नाइलाजाने वापरतात. ज्यांना शक्य आहे व परवडते ते पाणी शुद्ध करण्यासाठी यंत्रांचा उपयोग करतात. पण गरिबांनी काय करावे? त्यांना तर दूषित पाणी पिण्याशिवाय पर्याय नाही.

सन २०१८ मध्ये प्रसिद्ध केलेल्या अहवालात निती आयोगाने स्पष्टपणे लिहिले होते की, देशातील सुमारे ६० कोटी लोक गंभीर जलसंकटाला तोंड देत आहेत. अहवालानुसार सध्या जेवढे पाणी पुरविले जाते त्याच्या दुप्पट पाण्याची गरज सन २०३० पर्यंत असेल. एवढे पाणी पुरविता आले नाही तर त्याचा परिणाम जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रावर होईल. एवढेच नव्हे तर देशाच्या सकल राष्ट्रीय उत्पन्नातही (जीडीपी) सहा टक्क्यांपर्यंत घट होऊ शकते. आपले ७० टक्के जलस्रोत दूषित झालेले आहेत. म्हणूनच जगाच्या पाणी गुणवत्ता निर्देशांकात १२२ देशांत भारताचा क्रमांक १२० वा आहे. पाण्याविषयी दीर्घकाळ उदासीनता दाखविल्याचा हा परिणाम आहे. अजूनही सर्व राजकीय पक्षांनी पाण्याच्या मुद्द्यावर एक व्हावे. सत्तेसाठी एकमेकांना पाणी पाजणे बस्स झाले. आता सामान्य माणसाला पुरेसे शुद्ध पाणी उपलब्ध व्हावे यासाठी या पक्षांनी एवढ्याच हिरिरीने लढावे. वेळ फार थोडा आहे. वेळीच सावध झालो नाही, तर वेळ निघून गेलेली असेल. सत्ता कोणाचीही असली तरी देशातील नागरिकांना पुरेसे व शुद्ध पाणी पुरविणे हे सरकारचे कर्तव्य आहे.

# नालासोपाऱ्यात पोलिसांची नायजेरियनवर धडक कारवाई; धरपकड सुरू

**नालासोपारा :** गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी पालघर जिल्हाधिकारी डॉ. कैलास शिंदे आणि पोलीस अधीक्षक गौरव सिंग यांनी हाती घेतलेल्या मोहिमेअंतर्गत सोमवारी पहाटे तुळींज आणि नालासोपारा पोलीस, दहशतवाद विरोधी पथक, क्यूआरटी पथक, दंगल पथक, होमगार्ड अशा मोठ्या पोलीस फौजफाट्यासह प्रगती नगर परिसरात जाऊन नायजेरियन नागरिकांवर कारवाई करण्यास सुरुवात केली. ५० ते ६० नायजेरियन नागरिकांना तुळींज पोलीस ठाण्यात आणून भारतात राहण्यासाठी आवश्यक कागदपत्रे आहेत की नाही याची चौकशी करून तपास करत आहे.

उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल मांडवे यांच्या नेतृत्वाखाली तुळींजचे पोलीस निरीक्षक डी. एस.पाटील आणि नालासोपारा पोलीस निरीक्षक वसंत लब्दे यांच्या मार्गदर्शनाखाली दोन्ही पोलीस ठाण्याचे अधिकारी व कर्मचारी, क्यूआरटी पथकाचे २५ कर्मचारी, दंगल पथकाचे २५ कर्मचारी, दहशतवाद विरोधी पथकाचे सहाय्यक पोलीस निरीक्षक मानसिंग पाटील आणि त्यांचे १० कर्मचारी, १० ते १५ होमगार्ड असा तगडा बंदोबस्त घेऊन प्रगती नगर परिसरातील जय माता दि अपार्टमेंट, केडीएम अपार्टमेंट, बसेरा अपार्टमेंट, तारा अपार्टमेंट आणि साई नयन अपार्टमेंटमध्ये जात पोलिसांनी येथे राहत असलेल्या ५० ते ६० नायजेरियन महिला आणि



पुरुषांना ताब्यात घेऊन तुळींज पोलीस ठाण्यात आणले. काही नायजेरियन घरे उघडत नसल्याने पोलिसांनी दरवाजे तोडून यांना घराबाहेर काढले आहे. या सर्वांकडे योग्य ती कागदपत्रे, पासपोर्ट आहे का याची चौकशी केली जात असल्याचे उपविभागीय अधिकारी अमोल मांडवे यांनी सांगितले. ही कारवाई अशीच सुरू राहणार असल्याचेही ते म्हणाले.

***परदेशी भाडेकरूची माहिती देणे बंधनकारक***


नालासोपाऱ्यात राहणाऱ्या नायजेरियन नागरिकांवर अंकुश ठेवण्यासाठी पालघर पोलिसांनी संपूर्ण जिल्ह्यात दोन महिन्यांसाठी फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ (१)(२) अन्वये मनाई आदेश लागू केले आहेत. परदेशी नागरिकांची शहानिशा करूनच त्यांना घर, दुकाने हॉटेल तसेच जमीन भाड्याने देण्यापूर्वी त्यांचा रीतसर भाडे करार करून नजीकच्या पोलीस ठाण्यात माहिती दिल्याशिवाय भाड्याने देऊ नये असे आदेश पालघर पोलिसांनी दिले आहेत. या नियमांचा भंग झाल्यास त्याच्यावर कारवाई करण्यात येणार आहे.

## खंडणी मागणाऱ्या तिघांवर गुन्हा

**ठाणे -** एका घरात घुसून नव्याने केलेल्या घराचे बांधकाम तोडत छतावरील पत्राही दगडाने फोडल्याचा प्रकार तिघा तरुणांनी केल्याची घटना ठाण्यातील इंदिरानगर भागात घडली. या तरुणांनी घरातील सामानांची तोडफोड करून घराचे बांधकाम करायचे असल्यास २५ हजारांची खंडणीही मागितली. या प्रकरणी गणेश जाधव उर्फ काळा गण्या, राजेश कुरेकर आणि प्रेम या तिघांविरुद्ध श्रीनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

इंदिरानगर येथील हनुमान टेकडी परिसरात एक कुटुंब राहत असून त्यांची खोली मोडकळीस आल्याने त्यांनी घराची डागडुजीचे काम हाती घेतले आहे. घराच्या भिंती बांधल्या असून छतावर सिमेंटचे पत्रेही टाकले आहेत. मात्र २० नोव्हेंबर रोजी रात्री हे तिघे तरुण या कुटुंबाच्या घरी आले होते. त्यापैकी गणेश जाधव याने घराचे बांधकाम कोणाच्या परवानगीने करत आहात, माझी परवानगी घेतली का, असे विचारत धमकावले. या तीन तरुणांनी हातोडीने भिंत तोडली. तसेच, इतरही सामानाची तोडफोड केली असून २५ हजारांची खंडणीदेखील मागितली. तसेच, या कुटुंबाला ठार मारण्याची धमकीही दिली आहे. महिलेच्या तक्रारीनंतर रविवारी आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## भटक्या कुत्र्यांमुळे नागरिक हैराण



### *नसबंदी मोहिमेत पालिका अयशस्वी*

**नालासोपारा :** वसईतील नाक्या-नाक्यावर मध्यरात्रीनंतर भटक्या कुत्र्यांची दहशत असून नागरिकांना जीव मुठीत धरुन जावे लागत आहे. जागोजागी भटके कुत्रे दिसत असल्याने वसईकर हैराण झाले आहेत. भटक्या कुत्र्यांची नसबंदी आणि रेबीज इंजेक्शनसाठी महानगरपालिकेने खर्च केल्याचा दावा केला आहे. महानगरपालिकेच्या संबंधित विभागाने दिलेल्या माहितीनुसार २०११ ते २०१९ च्या दरम्यान अंदाजे २७ हजार कुत्र्यांची नसबंदी करण्यात आली असून प्रत्येक कुत्र्याला अंदाजे १ हजार १३ रुपये खर्च करण्यात आला आहे. पण, लाखो रुपये खर्च करूनही भटक्या कुत्र्यांच्या संख्या कमी होण्याऐवजी महानगरपालिकेच्या उदासीन कारभारामुळे त्यात लक्षणीय वाढ झाली आहे.

वसई - विरार शहर महानगरपालिकेने ऑक्टोबर २०११ मध्ये शहरांमध्ये भटक्या कुत्र्यांची नसबंदी करण्याची मोहीम सुरू केली होती. भटक्या कुत्र्यांनी हल्ला केल्याची एखादी बातमी प्रसिध्द झाली की त्या विषयावर सर्वत्र चर्चा होते. कालांतराने ती थंडावते. मुले, शालेय विद्यार्थी, सायकल तसेच बाईकस्वार, कचरा गोळा करून उपजीविका चालविणारे लोक भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्याचे बळी ठरत आहेत. भटक्या कुत्र्यांनी रात्री-अपरात्री केलेल्या पाठलागामुळे बाईकस्वारांचे गोंधळून अपघात होतात. त्यात गंभीर दुखापती होऊन जीव जाण्याचेही प्रकार घडत आहेत. भटक्या कुत्र्यांच्या उपद्रवामुळे इमारती तसेच संकुलाच्या शेजारील कचराकुंडीमधील कचरा सर्वत्र पसरवून त्यामुळे दुर्गंधी तसेच आरोग्याचा प्रश्न निर्माण होत आहे. याबाबत या विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांशी विचारणा केल्यानंतर त्यांनी 'लोकमत'ला सांगितले की, रोज १५ ते १८ भटक्या कुत्र्यांची नसबंदी केली जाते. पण एक कुत्री ५ ते ६ पिल्लांना जन्म देते. यामुळे कुत्र्यांची संख्या कमी होण्याऐवजी झपाट्याने वाढत आहे. शहरातील भटक्या कुत्र्यांची वाढती संख्या लक्षात घेऊन कुत्र्यांच्या निर्बीजीकरण करण्यासाठी महापालिका प्रशासनास एक नियोजनबध्द तसेच कालबद्ध कालबध्द कार्यक्रम आखून त्याची सत्वर अंमलबजावणी करण्याबाबतेच आदेश देणे गरजेचे आहे.

# उल्हासनगर महापालिकेवर पुन्हा शिवसेनेचा महापौर

## अवघ्या अडीच वर्षात भाजपाकडून हिसकवली सत्ता

उल्हासनगर महापौरपदाच्या निवडणुकीत भाजपाला मोठा धक्का बसला आहे. शिवसेनेने अवघ्या अडीच वर्षात भाजपाकडून सत्ता हिसकावून घेतली आहे. महापौरपदी शिवसेनेच्या लिलाबाई आशान विराजनमान झाल्या आहेत. लिलाबाई आशान यांना टीम ओमी कलानी आणि राष्ट्रवादीने पाठिंबा दिल्याने त्यांचा विजय झाला आहे. राज्यात आकाराला येत असलेल्या नव्या आघाडीचा परिणाम पालिकेतही पाहायला मिळाला. खुल्या गटासाठी आरक्षित असलेल्या महापौरपदासाठी भाजपाकडून सभागृह नेते जमनादास पुरस्वानी यांना उमेदवारी देण्यात आली होती. तर साई पक्षाकडून उपमहापौरपदावर असलेले जीवन इदनानी यांनी महापौरपदासाठी



उमेदवारी अर्ज दाखल केला होता.

उल्हासनगर महापालिकेत २०१७ मधील निवडणुकीत भाजपाने शिवसेनेला सोबत न घेताच पहिल्यांदा टीम ओमी कलानी आणि साई पक्षाच्या समर्थनाने सत्ता स्थापन केली होती. गेली अडीच वर्षे कलानी कुटुंबीयांना हाताशी धरत महापालिकेत सत्ता स्थापन करणाऱ्या भाजपाला महापौर पदाच्या निवडणुकीत आव्हानांचा सामना करावा लागणार हे निश्चित मानलं जात होतं. विधानसभा निवडणुकीत उमेदवारी न मिळाल्याने आक्रमक झालेल्या कलानी कुटुंबाच्या समर्थक नगरसेवकांनी शिवसेनेशी जवळीक वाढवली होती. तर, पालिकेतील सत्ता टिकवण्यासाठी भाजपने साई पक्षाचे प्रमुख जीवन इदनानी यांना महापौर पद देण्याची तयारी दर्शवली होती.


## प्रथम श्रेणीच्या डब्यात सेकंड क्लासच्या महिलांची घुसखोरी

**डोंबिवली -** महिलांच्या फर्स्ट क्लास डब्यामध्ये होणारी घुसखोरी थांबायलाच हवी. ती रोखण्यासाठी रेल्वे प्रशासन कमी पडत असून हजारो रुपये खर्च करूनही आम्हाला आरामदायक प्रवास मिळत नाही. त्यासाठी रेल्वे प्रशासनाएवढेच महिला प्रवासीही जबाबदार आहेत. सेकंड क्लासचे प्रवासी बिनधास्त फर्स्ट क्लासच्या डब्यात चढतात. त्यांना सांगूनही त्या खाली उतरत नाहीत. असे प्रकार वर्षानुवर्षे सुरू आहेत. त्यामुळे महिला प्रवाशांची अडचण होते. रोजच्या प्रवासात भांडणे, कटकटींचे प्रकार वाढले आहेत. याला रेल्वे प्रशासन आळा घालू शकते, पण इच्छाशक्तीचा अभाव असल्याचे प्रकर्षाने जाणवते.

# निर्मळ तलाव अतिक्रमणांच्या विळख्यात

**वसई -** वसईतील ऐतिहासिक महत्त्व असलेला निर्मळ तलाव सध्या अतिक्रमणांच्या विळख्यात सापडला आहे. या ठिकाणी मोठ्या प्रमाणात अतिक्रमणे करण्यात आल्यामुळे येथील तलावात सांडपाणी, कचरा टाकण्यात येत आहे. त्यामुळे या तलावातील पाणीत दूषित होत असून या तलावाची पालिकेमार्फत स्वच्छता आणि अतिक्रमणे हटविण्यात यावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

वसई पश्चिमेकडील भागात निर्मळ परिसर आहे. या ठिकाणी आद्य जगद्गुरू शंकराचार्य यांचे समाधी मंदिर आहे. त्यामुळे हा परिसर तीर्थक्षेत्र म्हणून ओळखला जातो. त्यामुळे काही भाविक या पाण्यात स्नान करण्यासाठी येत असतात. परंतु सध्या या तलावाच्या सभोवताली मोठ्या प्रमाणात गवत उगवले आहे तर दुसरीकडे या तलावाच्या ठिकाणी कपडे धुणे, सांडपाणी सोडणे, अनधिकृत बांधकामे यांसारख्या गोष्टी केल्या जात असल्याने तलावाचे पाणी दूषित होऊ लागले आहे. त्यामुळे हळूहळू या तलावाचे पावित्र्य धोक्यात येत असल्याचा आरोप येथील नागरिकांनी केला आहे. सध्या जगद्गुरू शंकराचार्य यांच्या यात्रोत्सव सोहळ्याला सुरुवात झाली असून हा सोहळा आठवडाभर सुरू राहणार आहे. त्यामुळे मोठ्या संख्येने भाविक या यात्रोत्सवाला येत असतात, यासाठी निर्मळ तलावाची स्वच्छता करून आजूबाजूला असलेले अतिक्रमण हटविण्यात यावे, या मागणीसाठी वसईचे शिवसेना नेते नितीन म्हात्रे व त्यांच्या शिष्टमंडळाने पालिकेचे आयुक्त बी. जी. पवार यांची



भेट घेऊन लेखी स्वरूपात केली आहे. तसेच, निवेदनात तात्काळ उपाययोजना करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. यावर पालिकेचे आयुक्त बी. जी. पवार यांनीसुद्धा या तलावाची स्वच्छता करून पुढील कारवाई करण्यात येईल, असे आश्वासन दिले आहे.

# अजित पवारांना भाजपकडून मुख्यमंत्रिपदाची ऑफर: संजय राऊत



**नवी दिल्लीः राष्ट्रवादी काँग्रेसचे बंडखोर नेते अजित पवार यांची मनधरणी करण्याचे प्रयत्न सुरू असतानाच, शिवसेनेचे खासदार संजय राऊत यांनी पवार आणि भाजपमध्ये झालेल्या 'डील'विषयी आज मोठा गौप्यस्फोट केला. भाजपनं अजित पवार यांना मुख्यमंत्रिपदाची ऑफर दिली आहे, असा दावा राऊत यांनी केला आहे. सत्तेचा कितीही गैरवापर करा, पण आम्ही पुरून उरू, असं सांगतानाच, विश्वासदर्शक ठरावावेळी आमचा आकडा दहाने जास्त असेल, असंही त्यांनी सांगितलं.**

शिवसेना, काँग्रेस व राष्ट्रवादी आघाडीचं सरकार राज्यात येणार असं वाटत असतानाच राष्ट्रवादीचे नेते अजित पवार यांनी बंडखोरी करत भाजपशी हातमिळवणी केल्यानं राज्याच्या राजकारणाला वेगळीच कलाटणी मिळाली आहे. या घटनेनंतर राज्यातील राजकीय घडामोडींना वेग आला आहे. अजित पवारांनी दिलेल्या धक्क्यानंतर शरद पवार पुन्हा एकदा पक्षाला सावरण्यासाठी सरसावले असून काही आमदार राष्ट्रवादीकडे परतले आहेत. तर अजूनही काही आमदार 'बेपत्ता' असल्याचं बोललं जात आहे. अशातच आता शिवसेनेचे खासदार राऊत यांनी भाजपवर तोफ डागली आहे. अजित पवार यांना भाजपकडून मुख्यमंत्रिपदाची ऑफर देण्यात आली आहे. अडीच वर्षे भाजपचा मुख्यमंत्री आणि अडीच वर्षे अजित पवार हे मुख्यमंत्री होतील अशी ऑफर देऊ केली आहे, असा दावा राऊत यांनी केला.

## 'भाजपच्या नेत्यांची माथी फिरलीत'

**यावेळी राऊत यांनी भाजपवर तोफ डागली. सत्तेचा कितीही गैरवापर करा. आम्ही पुरून उरू. कितीही गडबड, घोटाळे करा, पण विधानसभेत विश्वासदर्शक ठरावावेळी तुमच्यापेक्षा आमच्याकडे दहाने आकडा अधिक असेल, असा दावा त्यांनी केला. भाजपच्या नेत्यांची माथी फिरलेली आहेत. सत्ता नसेल तर यांना वेड लागेल. महाराष्ट्रात आमचं सरकार आल्यानंतर आरोग्यमंत्र्यांना सांगून त्यांच्यासाठी मनोरुग्णालये उभारण्यास सांगू, अशी मिश्किल टिप्पणी त्यांनी केली.**

## भाजपवर तोफ

अजित पवार यांच्यासोबत गेलेले सर्वच आमदार परतले आहेत. काही आमदारांना गुरूग्रामच्या एका हॉटेलमध्ये डांबून ठेवण्यात आल्याचा आरोप राऊत यांनी भाजपवर केला. आमदारांच्या सुटकेसाठी शिवसेना आणि राष्ट्रवादीचे लोकही गेले होते. त्यांना परत आणण्यात आलं आहे. ते आमदार आता भाजपनं कशा प्रकारे दबाव आणला, याचा वृत्तांत सांगत आहेत. त्यांना काही ऑफर देण्यात आल्या, तर काहींना भीती दाखवण्यात आली, असा दावाही राऊत यांनी केला. हॉटेलमध्ये पाच ते सहा लोकांना डांबून ठेवलं होतं. त्यांच्यावर पहारा देण्यासाठी भाजपनं गुंड ठेवले होते, हरयाणात सरकार असल्यानं त्याचा गैरफायदा घेऊन पोलीस बाहेर तैनात केले होते. लोकशाहीसाठी हे चांगलं लक्षण नाही. मुख्यमंत्रिपद मिळवण्यासाठी या देशातील राज्यकर्ते कुठल्या थराला जात आहेत. हे सगळं घृणास्पद आहे. बहुमत असल्याचं राज्यपालांना सांगितलं आणि शपथ घेतली; मग गुंडगिरी, दरोडेखोरी हे सगळं करण्याची गरज काय आहे. भाजपनं असे करून राज्यपाल, राष्ट्रपती आणि महाराष्ट्रातील जनतेची फसवणूक केली आहे, अशी तोफही त्यांनी डागली.

# बँकांचा सुशासित कारभार; नवी नियमावली लवकरच

**मुंबई** – बँकांचा कारभार सुशासित असावा याकरिता रिझर्व्ह बँक लवकरच नवीन नियमावली तयार करेल, असे स्पष्ट करतानाच यानुसार वाणिज्य बँकांना कर्ज खात्यांविषयी अधिक माहिती जाहीर करावी लागेल, असे डेप्युटी गव्हर्नर एन. एस. विश्वनाथन यांनी शुक्रवारी येथे सांगितले.



अनुत्पादित मालमत्तेपोटी सोसावे लागणारे नुकसान बँकांनी वेळीच निश्चित करावे, असेही विश्वनाथन यांनी व्यापारी बँकांना सुचविले. एका इंग्रजी वृत्त माध्यमाच्या कार्यक्रमाला उपस्थित राहणाऱ्या विश्वनाथन यांनी, रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आलेल्या उपाययोजनांचा आढावा घेतला. बँकांचा व्यवस्थापनसाठीचा नुकसानभरपाई आराखडा तसेच बँकांच्या पूर्णवेळ संचालक नियुक्तीबाबतचा उल्लेख करत याबाबत अधिक सुधारणा करण्यात येतील, असेही ते म्हणाले.

आंतरराष्ट्रीय स्तरावरील बँकांबाबतच्या 'बसेल समिती'सारख्या बँकांमधील सुशासन व्यवस्था आणखी वृद्धिंगत करण्याबाबत भविष्यात पावले उचलली जातील, असे विश्वनाथन यांनी सांगितले. याबाबतचे नियम अंतिम करण्यापूर्वी रिझर्व्ह बँक त्यासाठी सूचना व हरकती मागवेल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

भांडवली बाजार नियामक सेबी अध्यक्षांनीही गुरुवारीच स्पष्ट केल्याप्रमाणे थकीत कर्जाबाबतची माहिती त्वरित जाहीर करण्याचे बंधनकारक केले आहे. याबाबत रिझर्व्ह बँकही सहमत असून अशी कर्जे जाहीर करण्यासाठी बँकांनीही वार्षिक अहवालापर्यंत प्रतीक्षा करू नये, असे विश्वनाथन म्हणाले.

स्थानिक स्वराज्य संस्थांची महसुली क्षमता वाढण्यासाठी सहकार्याची अपेक्षा व्यक्त करतानाच रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर शक्तिकांत दास यांनी राज्य वित्त आयोगांना संस्थागत रूप यायला हवे, असे प्रतिपादन केले. रिझर्व्ह बँक मुख्यालयात शुक्रवारी आयोजित १७व्या एल. के. झा स्मृती व्याख्यानादरम्यान दास यांनी, राज्यांच्या वित्त आयोगाला वस्तू व सेवा कर निर्मिती तसेच निती आयोगाच्या स्थापनेदरम्यान हातभार लागला, असे स्पष्ट केले.

# राज्याच्या तिजोरीलाही मंदीची झळ!

**नवी दिल्ली - देशातील आर्थिक मंदीसदृश्य स्थितीची झळ कंपन्या, उद्योगांबरोबरच राज्याच्या तिजोरीलाही बसू लागली आहे. राज्याच्या तिजोरीत सर्वाधिक भर घालणाऱ्या वस्तू व सेवा कराच्या (जीएसटी) उत्पन्नात कमालीची घट झाल्याने राज्य प्रशासन हवालदिल झाले असून, उत्पन्न वाढीसाठी करचुकवेगिरी करणाऱ्या व्यापाऱ्यांवर कारवाईचा बडगा उगारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.**



देशात आर्थिक मंदी नसल्याचा दावा केंद्र आणि राज्य सरकारकडून गेल्या काही महिन्यांपासून सातत्याने केला जात होता. मात्र, राज्यातील अनेक उद्योगांना तसेच व्यापारी आस्थापनांना मंदीचा फटका बसू लागल्याचे आता राज्य सरकारही मान्य करू लागले आहे. निवडणुका डोळ्यासमोर ठेवून सरकारने केलेल्या विविध घोषणा, पूरग्रस्त, दुष्काळग्रस्तांसाठी दिलेली मदत आणि विकास योजनांवर झालेला मोठा खर्च याचा ताळमेळ घालताना राज्याच्या तिजोरीवर मोठा ताण पडत आहे. त्यातच तिजोरीत येणाऱ्या महसुलातही मोठ्या प्रमाणात घट होऊ लागल्याने प्रशासनाची चिंता वाढली आहे. वस्तू आणि सेवा कराच्या माध्यमातून मिळणाऱ्या महसुलाचा राज्याच्या उत्पन्नात सर्वाधिक वाटा असतो. सरकारने चालू आर्थिक वर्षांत वस्तू व सेवा कराच्या माध्यमातून एक लाख ४२ हजार कोटी रूपयांच्या महसुलाचे उद्दीष्ट ठेवले होते. प्रत्यक्षात मात्र ऑक्टोबरअखेर या कराच्या माध्यमातून ८२ हजार कोटी रूपयांचा महसूल गोळा झाला. त्यामुळे उर्वरित कालावधीत उद्दीष्ट पूर्ण होण्याबाबत साशंकता व्यक्त होत आहे. विशेष म्हणजे गेल्या वर्षी वस्तू व सेवा करातून मिळणाऱ्या उत्पन्नात १२-१३ टक्के वाढ होती. मात्र यावेळी ती जेमतेम पाच ते सहा टक्क्यांपर्यंत मर्यादित राहिली असून जुलै, ऑगस्टमध्ये ती उणे गेली होती. विक्री आणि सेवा कराप्रमाणेच महसूल, परिवहन या विभागाचा महसूलही अपेक्षेप्रमाणे नसल्यामुळे उत्पन्न आणि खर्चाचा ताळमेळ घालताना वित्त विभागास तारेवरची कसरत करावी लागत असल्याची माहिती मंत्रालयातील सूत्रांनी दिली.

वस्तू व सेवा कराच्या उत्पन्नात घट होत असल्याबद्दल केंद्र सरकानेही चिंता व्यक्त केली असून करचुकवेगिरी करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. या कराच्या वसुलीबाबत केंद्र सरकारकडमून सातत्याने आढावा घेतला जात आहे. त्यानुसार मुख्य सचिव अजोय मेहता यांनीही अलिकडेच वस्तू व सेवा कर विभाग आणि वित्त विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक घेऊन कारवाईचे आदेश दिल्याचे समजते. त्यानुसार करचुकवेगिरी करणाऱ्या सुमारे ७५-८० बड्या व्यापाऱ्यांची यादी तयार करण्यात आली असून त्यात काही हवालाच्या माध्यमातून व्यापार करून कर चुकवत असल्याचे निदर्शनास आले आहे.

# यंदा हिवाळी अधिवेशन मुंबईतच होण्याची शक्यता!

**मुंबई-** नागपूर करारानुसार वर्षातील एक अधिवेशन उपराजधानी नागपूरमध्ये घेण्याची परंपरा आहे. पण सध्याची महाराष्ट्रातील राजकीय परिस्थिती पाहता यंदा नागपूरमध्ये अधिवेशन होण्याची शक्यता कमीच आहे. शिवसेना, काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसने सत्ता स्थापनेचा दावा केल्यानंतर आमदारांच्या शपथविधीसाठी तीन दिवसांचे अधिवेशन मुंबईत होईल. त्यानंतर नागपूरमध्ये हिवाळी अधिवेशन घ्यायचे झाल्यास तयारीसाठी लागणारा वेळ पाहता एवढ्या कमी कालावधीत अधिवेशनाची तयारी कशी होणारयाची चिंता अधिकाऱ्यांना आहे. त्यामुळे यंदाचे हिवाळी अधिवेशन मुंबईतच होईल, अशी माहिती मंत्रालयातील एका वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली.

राष्ट्रपती राजवटीनंतर शिवसेना, काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस या तीन पक्षांच्या सत्ता स्थापनेला वेग आला असून नोव्हेंबर महिन्याच्या अखेरपर्यंत सरकार स्थापनेचा दावा केला जाण्याची शक्यता आहे. राज्यपालांकडे सत्तास्थापनेचा दावा केल्यानंतर डिसेंबर महिन्यांच्या पहिल्या आठवड्यात आमदारांच्या शपथविधीसाठी तीन दिवसांचे अधिवेशन घेतले जाईल. मात्र, त्यानंतर परंपरेनुसार नागपूरला



अधिवेशन घ्यायचे झाल्यास तयारीसाठी कमी वेळ मिळणार आहे. दर वर्षी डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यात हिवाळी अधिवेशन होते. यासाठी सुमारे महिनाभर आधी तयारी सुरु होते. अधिवेशनाच्या एक आठवडा आधी मुंबईहून संपूर्ण मंत्रालय कर्मचारी आणि सरकारी अधिकारी नागपुरात पोहोचतात. मुंबईतून नागपूरला मंत्रालयातून विविध विभागांच्या फायली ट्रक भरुन नागपूरला पोहोचतात. अशावेळी उपराजधानी नागपूर म्हणजे मिनी मंत्रालयच होते. परंतु, यंदा नागपूरला अधिवेशन होणार किंवा नाही, याबाबत मंत्रालयातील अधिकारी व कर्मचारी अनभिज्ञ आहेत. मात्र, महाराष्ट्रातील राजकीय परिस्थिती पाहता यंदाचे नागपूरचे हिवाळी अधिवेशन मुंबईतच होईल, अशी माहिती वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली.

५५ वर्षांनंतर २०१८ मध्ये राज्याच्या तत्कालीन फडणवीस सरकारने हिवाळी अधिवेशन नागपूर ऐवजी मुंबईत घेतले होते. त्यानंतर विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन जुलै महिन्यात नागपूरमध्ये घेतले होते. १९६३ नंतर पहिल्यांदाच हे अधिवेशन मुंबईत घेतले गेले होते. १९६३ मध्ये ९ डिसेंबर ते २० डिसेंबरपर्यंत मुंबईत हिवाळी अधिवेशन झाले होते.

# आवक घटल्याने कांदा सात हजार पार

**नाशिक-** जवळपास संपुष्टात आलेला जुना कांदा आणि पावसाच्या तडाख्याने नव्या कांद्याची घटलेली आवक यामुळे भाव दिवसागणिक नवी उंची गाठत आहे. शुक्रवारी लासलगाव बाजार समितीत प्रति क्विंटलच्या दरात ५०० रुपयांनी वाढ होऊन त्याने सात हजाराचा टप्पा ओलांडला. पिंपळगाव बाजार समितीत सरासरी दर साडेसात हजारापर्यंत वधारले. लासलगाव बाजारात केवळ दीड हजार क्विंटल, तर पिंपळगावच्या बाजार समितीत केवळ ९०० क्विंटलची आवक झाली.

दिवाळीनंतर नवीन कांद्याची आवक सुरू होते. यंदा अवकाळी पावसाच्या तडाख्याने जिल्ह्यातील शेतीचे अतोनात नुकसान झाले. यामध्ये कांदा क्षेत्राचे प्रमाण मोठे आहे. काढणीवर आलेला कांदा पाण्याखाली गेल्याने सडला.



या नुकसानीमुळे नव्या कांद्याची आवक कमालीची घटली आहे. कांद्याच्या सर्वात मोठ्या लासलगाव बाजार समितीत नोव्हेंबरमध्ये दरवर्षी अडीच ते तीन लाख क्विंटल आवक होते. यंदा हे प्रमाण दीड ते पावणे दोन क्विंटलने घटण्याची शक्यता आहे. देशांतर्गत मागणी वाढूनही आवक मंदावली आहे. यामुळे घाऊक बाजारात कांदा दररोज विक्रमी दर गाठत आहे.

गुरूवारी लासलगाव बाजारात उन्हाळ कांद्याला साडेसहा हजार रुपये सरासरी दर मिळाले होते. दुसऱ्या दिवशी त्यात ५०० रुपयांनी भर पडून ते ७०१२ रुपयांवर पोहोचले. नव्या कांद्याला ५४०१ रुपये दर मिळाले. उन्हाळ कांद्याची ६२३ तर नव्या कांद्याची ९१५ क्विंटल आवक होती. आजवरच्या इतिहासात उन्हाळ कांद्याला मिळालेले हे सर्वाधिक दर आहे.


# गुरुच्या चंद्रावर बाष्परुपात पाणी: नासाचा दावा

**वॉशिंग्टन-** आपल्या सूर्यमालेतील सर्वात मोठा ग्रह असलेल्या गुरुच्या युरोपा या उपग्रहावर पाणी असल्याचा दावा नासा या अमेरिकन अंतराळ संशोधन संस्थेने केला आहे. नासाला संशोधनादरम्यान या उपग्रहावर पाण्याचे बाष्प आढळून आले आहेत. या दाव्यामुळे युरोपावर पाण्याचा मोठा स्त्रोत असलेला सुमद्रही अस्तित्वात असू शकतो, असेही नासाच्या वैज्ञानिकांनी म्हटले आहे.



या संदर्भात नासाने एक ट्विट केले असून यामध्ये युरोपाच्या बर्फाच्छादित पृष्ठभागावरुन अधूनमधून फवाऱ्यांप्रमाणे पाणी बाहेर पडत असल्याचे म्हटले आहे. याचे पुरावे संशोधकांना मिळाले असल्याचे नासाने म्हटले आहे. मात्र, या पाण्याचे मॉलेक्युलस मोजण्यात आलेले नसल्याने याबाबत पुष्टी होऊ शकलेली नाही. जीवसृष्टीसाठी लागणारे आवश्यक घटक या उपग्रहावर असू शकतात, अशी शक्यता ताज्या संशोधनावरुन व्यक्त करण्यात आली आहे. पृथ्वी व्यतिरिक्त इतर ग्रहांवर जीवसृष्टीचा शोध घेण्यासाठी नासा प्रयत्नशील आहे. मात्र, अशी जीवसृष्टी अस्तित्वात येण्यासाठी तिथे पृथ्वीप्रमाणे पाणी असणे आवश्यक आहे. त्यामुळे असे पाण्याचे अस्तित्व शोधण्याच्या दृष्टीने वैज्ञानिकांचे प्रयत्न सुरू आहेत. चंद्राच्या ७९ चंद्रांपैकी एक असलेला युरोपा हा चंद्र किंवा उपग्रह त्यासाठी महत्त्वाचा ठरला आहे. चाळीस वर्षांपूर्वी व्होयागर अंतराळयानाने या युरोपाची जवळून काही छायाचित्रे टिपली होती. त्यावेळी युरोपावरील बर्फाच्या पृष्ठ भागावर करड्या रंगाच्या काही भेगा आढळून आल्या होत्या. या भेगांमधून अधूनमधून पाण्यासारखे फवारे बाहेर पडत असल्याचे संशोधकांचे म्हणणे होते. त्यानंतर अलीकडेच झालेल्या अधिकच्या संशोधनात हे फवारे पाण्याचे फवारे असावेत, असा दावा संशोधकांनी केला आहे.

# भारतात रोज २५ हजार टन प्लास्टिकचा कचरा



**नागपूर :** भारतात प्लास्टिकच्या वापराला बंदी घालण्यात आली असली तरीही दररोज २५ हजार टनांहून अधिक प्लास्टिकचा कचरा येथे तयार होतो. त्यातील ४० टक्केही कचरा गोळा केला जात नाही. तो वातावरणात तसाच पडून राहतो. केंद्रीय पर्यावरण मंत्रालयानेच शुक्रवारी याची कबुली दिल्याने प्लास्टिकबंदीचा पुरता फज्जा उडाल्याचे स्पष्ट झाले आहे.

सततच्या आर्थिक विकासामुळे ग्राहकांची वस्तूंची मागणी वाढत आहे. त्यामुळे या क्षेत्रातील प्लास्टिकचा वापरही वाढत आहे. वस्तूंचे सुरक्षित पॅकेजिंग आणि कमी किमतींमुळे प्लास्टिकचा वापर केला जातो. प्लास्टिकला हरित पर्याय शोधणे हेदेखील एक आव्हान आहे. केंद्राने प्लास्टिकबंदीसाठी नियम तयार केले आणि प्लास्टिकबंदी केली, पण त्याचा काहीही उपयोग झालेला नाही. पुनर्नवीकरण केलेले प्लास्टिक अनेक उत्पादनांच्या निर्मितीसाठी वापरले जाते. उर्वरित दहा हजार ५५६ टन प्लास्टिक कचरा वाया जातो, तो एकूण कचऱ्याच्या ४० टक्के इतका आहे.

JET TECHNO SERVICES PVT LTD.
Email :jettechnoservices@gmail.com

Senior Citizen Social Rights Foundation
सिनिअर सिटीझन सोशल राईटस् फाऊंडेशन
Email : scsocialrightsfoundation@gmail.com • NITY AAYOG UNIQUE ID : MH2019/0224064

R.N.I.no. MAHAR/2014/57121
मानवाधिकार बातमी
संपादक:- दिपक मोरेश्वर नाईक
PRESS

Annapurna Caterers
Udyog Aadhaar Number : MH33A0133630

R.N.I.no.MAHAR/2014/55402
महानगर समाचार
आपले स्वातंत्र आपले विचार
संपादक:- दिपक मोरेश्वर नाईक
PRESS

अखिल भारतीय मानवाधिकार युनियन
संस्थापक
दिपक मोरेश्वर नाईक
9594418181 / 9594047474

SOCIAL RIGHTS FOUNDATION
(सोशल राईटस् फाऊंडेशन)
महा/२०७०/१५ ठाणे संस्था नोंदणी अधिनियम १८६० द्वारा नोंदणी

R.N.I. No. MAHMAR/2014/60133
पोलिस बातमी पत्र

आश्रय ट्रस्ट
सामाजिक • शैक्षणिक • सांस्कृतिक

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीय इस्टेटच्या बाजूला, गेट नं. २, गोरेगांव (पूर्व), मुंबई - ४०० ०६३ येथे छापून २, राजाराम को. ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर (पूर्व), ठाणे - ४०१ १०५ येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत)